-: जाहिर निविदा :-

अहमदनगर जिल्हयातील न्यायालयांतील लेखा व वित्त विभाग तसेच इतर विभाग यांचे कामकाजासाठी Windows 11 Pro चे एकुण ५२ Physical License खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे त्याबाबतची दरपत्रके अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्री करणा-या विक्रेत्याकडून मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.
२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.
३. आपल्या फर्मच्या नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.
४. नमुद उपकरणाचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.
५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहीणे आवश्यक आहे.
६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर असा पत्ता असणे आवश्यक आहे.
७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाव्दारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणुन दयावेत.
८. दरपत्रकामध्ये नमुद उपरकरणाचा दर लिहीणे आवश्यक आहे. अपुर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आलेला आहे.
९. सदरहु दरपत्रक दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सांयकाळी ०६:०० वाजेपर्यंत देणे आवश्यक आहे.
१०. तत्पर व जलद सेवा देणा-या फर्मंना प्राधान्य देण्यात येईल.
११. दरपत्रकाबाबत दबाव आणणाचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.
१२. कोणतेही कारण न देता दरपत्रक अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.
१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तींची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक मंगळवार दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर डी. एस. पी. चौक अहमदनगर येथे बारनिशी विभागात आणुन देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

अधिक्षक,
संगणक विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :-२२/०१/२०२६

प्रत माहितीस्तव :-

१. मा. अधिक्षक, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई-कोर्ट वेबसाईट